
# तुमच्या मुलाला बोलायला शिकण्यास तुम्ही कशी मदत कराल



MARATHI

# कर्णबधिरांकरिता आशेचा किरण

## प्रस्तावना

मुले आपले आई-वडील, नातेवाईक आणि आसपासच्या लोकांचे बोलणे ऐकून व त्याचे अनुकरण करून लहान मुले बोलण्यास शिकतात. साधारणपणे मूल १२ महिने वयापर्यंत त्याच्या / तिच्या पहिल्या अर्थपूर्ण शब्दाचा उच्चार करते. २४ ते ३६ महिने वयापर्यंत तो / ती वाक्यांमध्ये बोलायला सुरुवात करतात. परंतु दक्ष पालकांना फार आधीच आपल्या मुलांमध्ये श्रवणदोष किंवा वाचादोषाची शंका येते. जर मूल उशीरा बोलायला लागते, तेव्हा पालक काळजी वाटून चिंता व्यक्त करू लागतात. त्यांना पुन:पुन्हा खात्रीची, प्रोत्साहनाची, तसेच व्यावसायिकांच्या मदतीची आवश्यकता असते.

मुलांना चांगल्या आणि योग्य पद्धतीने बोलण्यासंबंधी मदत करण्यासाठी 'काय करावे', किंवा 'काय करु नये'; यासाठी काही गोष्टी / बाबी येथे नमुद केलेल्या आहेत. सुयोग्य वाचा आणि भाषा उत्तेजन देण्याच्या दृष्टिकोनातून या सूचना मार्गदर्शक ठरतील. एकत्रितपणे, या सूचना मार्गदर्शक तत्त्वांसोबत अधिक कार्यक्षम आहेत, ज्या तुम्हांस आणि आपल्या विशिष्ट मुलांस योग्य रीतीने कार्य करण्यासाठी प्रभावी आहेत.

जर आपणांस या सूचनांचा अवलंब करण्यासंबंधी काही प्रश्न / शंका असतील, तर आमच्याशी


# मुलांच्या वाचा विकास प्रक्रियेतील टप्प्यांविषयी परिचित रहा.

वाचा / भाषा विकासातील टप्प्यांचा परिचय असणे महत्वपूर्ण आहे, कारण........

- जर आपले मूल विशिष्ट टप्पा चुकत असेल, तर त्याला / तिला तत्काळ स्पीच थेरपीस्ट (वाचा विशेषज्ञ) कडे संदर्भित करा.
- आपण आपल्या मुलांमध्ये वाचा तथा भाषा विकास आणि सुधारणा करतेवेळी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास देखील निर्माण करु शकता.

## सूचना...

- शिक्षकांकडून किंवा संदर्भ पुस्तकांमधून वाचा विकास टप्प्यांविषयी माहिती एकत्रित करा.
- आपल्या मुलांच्या वाचा / भाषा कामगिरीविषयी दक्ष / जागरुक रहा.
- भाषा आकलन, तसेच वाचा संदर्भातील त्याची / तीची प्रगती इतर सामान्य मुलांप्रमाणेच आहे, याचे नियमित परीक्षण करीत रहा.



# अल्प वयामध्येच सुरुवात करा

अल्प वयाची सुरुवात जन्मानंतर होते जी बोली भाषेच्या जलद विकासासाठी 'संवेदनशील' असते. श्रवणदोष असलेल्या आपल्या मुलांची वाचा इतर सामान्य मुलांच्या वाचा विकास टप्प्यांसारखी असू शकत नाही. आपण जवळपास सर्व वेळ आपल्या मुलांसोबत असता त्यामुळेच, जर आपण आपल्या मुलांना वाचा / भाषा प्रशिक्षण देण्यास लवकर सुरुवात कराल तर त्याद्वारे त्याला / तिला सुलभ वाचा विकसित करण्याची संधी मिळेल.

## सूचना...

- आपल्या मुलांना वाचेची / भाषेची चालना देण्यास लवकर सुरुवात करा.
- श्रवणयंत्राच्या सतत आणि कायमस्वरुपी वापराची खात्री करा.
- आपल्या मुलांसोबत जास्तीत-जास्त वेळ खर्च करा / घालवा.
- बहुतेक वेळ मुलांशी स्पष्टपणे, हळुवारपणे आणि नैसर्गिकरित्या बोला.
- आसपासच्या प्रत्येक गोष्टी / वस्तूंविषयी आपल्या मुलांशी बोला, कारण, दैनंदिन जीवनातील प्रसंग आपल्या मुलांस वाचा / बोलणे शिकण्यासाठी योग्य संधी उपलब्ध करुन देतात.
- सभोवतालच्या वस्तु / प्रसंगांसाठी नावांचा वापर करा.कोणत्याही गोष्टिला नावाने हाक मारुनच मुले आपले शब्द शिकतात.
- लक्षात ठेवा, आई ही पहिली गुरु असते. ती सदैव उत्साही आणि सकारात्मक असावी.




# अनुकरणाद्वारे शिक्षण

सर्वच मुले चांगले अनुकरण करतात / करु शकतात. परंतु श्रवणदोष असलेल्या मुलांमध्ये अनुकरण करण्याची क्षमता फारच कमी असते. जी मुले श्रवणयंत्राचा वापर करतात, ती मुले तुमच्या वाचेतील (गळ्यातील) कंपनांचा अनुभव घेऊन बोलायला शिकतात. जेव्हा आपण बोलता, तेव्हा त्याचा / तिचा हात आपल्या गळ्यावर ठेवा. तो / ती सुद्धा तुमच्या वाचेतील वर्णोच्चार, चेहऱ्यावरील हावभाव, चेतना, इ. चे अनुकरण करुन त्यांचा बोली भाषेच्या ऐकण्याच्या आणि प्रकटीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आधारभूत पद्धतीने / रीतीने वापर करतात. अशा रीतीने, श्रवणदोष असलेली मुले सुयोग्य आणि सुलभ पद्धतीने बोलायला शिकतात.

## सूचना...

- त्याच्या / तिच्या क्षमतांचा पूर्णतः वापर करुन घ्या.
- ध्वनी / स्वर एकत्रित करणे ही मजेशीर बाब आहे.
- वाचेचे शिक्षण आनंददायी / सुखकारक बनेल याची खात्री करा.
- आपण जे काही बोलता, त्याचा पुनरुच्चार करा.
- चेहऱ्यावरील हावभाव किंवा ओठांच्या हालचालींची अतिशयोक्ती करु नका.
- ठराविक मर्यादेपर्यंत त्याच्या / तिच्या प्रयत्नांचे कौतुक करा.




# आपल्या मुलांच्या उच्चारांचा विस्तार करा

श्रवणयंत्र वापरत असलेली कर्णबधीर मुले चांगल्या आणि योग्य वाचेची / भाषेची चालना आत्मसात करतात, परंतु शब्दांचे योग्य प्रगटीकरण करु शकत नाहीत. (बहुतेकरित्या एक / दोन शब्दांचा किंवा चिन्हांचा वापर करतात.) आदर्श वाचा असणाऱ्या व्यक्तींची वाचा मुलांच्या उच्चारांचा विस्तार करण्यासाठी महत्वपूर्ण आहे, जसे की, सुधारणा (वाक्‌सुधारणा), संवाद, इ. हळुवारपणे कर्णबधीरत्व असलेली मुले व्याकरणदृष्ट्या कसे बोलावे हे शिकतात.

## सूचना...

- बोलण्याची गरज निर्माण करा आणि आपल्या मुलांस जास्तीत-जास्त बोलण्यासाठी उत्तेजन द्या.
- मुलांच्या बोलण्याच्या प्रयत्नांसाठी बक्षीस / शाबासकी द्या.
- त्याच्या / तिच्या बोलण्याची अपेक्षा ठेवा. बोलण्याची घाई करु नका. त्याला / तिला बोलण्यासाठी पुरेशी संधी द्या.
- प्रत्येक वेळी त्याच्या / तिच्या चुकांची सुधारणा करुन संतप्त करु नका. तसेच मुलांच्या वापरातील शब्दांचा / उच्चारांचा योग्य रीतीने विचार करुन त्यांना सुयोग्य आणि आदर्श नमुना उपस्थित करा.



# खेळाद्वारे बोलणे शिकणे

खेळाद्वारे बोलणे शिकणे ही मुलांसाठी एक मनोरंजनात्मक बाब आहे. ही बाब मुलांमध्ये तुमच्या चेहऱ्याकडे पाहण्याची आवड निर्माण करते. अशा पद्धतीने मुलांच्या ऐकण्याची तसेच संवादात्मकरित्या जिज्ञासू वृत्तीने प्रश्न विचारण्याची प्रेरणा मिळते. कर्णबधीर व्यक्तींना वाचेची चालना देण्यासाठी योग्य आणि आदर्श वाचेचा नमुना असणे आवश्यक आहे. वाचेची चालना देण्यासाठी विविध क्रियांची रचना पलकांद्वारे तसेच शिक्षकांद्वारे केली जाऊ शकते. कर्णबधीर मुलांना अपरिचित शब्दांची तसेच ध्वनींची कल्पना विकसित करण्यासाठी याद्वारे मदत मिळेल.

## सूचना...

- आपल्या क्रियांचा त्या करतेवेळी खुलासा करा.

- आपल्या प्रत्येक क्रियेचे कथन / वर्णन करा.
  उदाहरणार्थ : जर तो / ती कारसोबत खेळत असेल, तर आपण बोलू शकता,
  ''अरे, तुझ्याकडे कार आहे?'' ''किती मोठी कार आहे ही!'',
  ''ही सुंदर पिवळ्या रंगाची कार आहे.''
  ''तुझी कार मला आवडली. आता जसे तु तिला पुढे ढकलशील तशी पीप....पीप.... पीप आवाज करीत पुढे जाईल.




## आपल्या मुलांच्या क्षमतांविषयी रुची निर्माण करा.

कर्णबधीर असलेल्या आपल्या मुलांशी नैसर्गिकरित्या संवाद साधा. जेव्हा आपण आपल्या मुलांशी बोलता, तेव्हा असे गृहित धरा की तो / ती एक सामान्यपणे ऐकणारे मुल आहे. जेव्हा आपले मूल काही बोलू इच्छिते, तेव्हा त्याच्याशी / तिच्याशी अधिक संवाद साधण्यासाठी त्याच्या / तिच्या प्रत्येक घटना, खरेदी वगैरे इ. संदर्भात जास्तीत जास्त बोला.

## सूचना...

- आपल्या मुलांच्या आवडी-निवडींकडे लक्ष द्या आणि त्यानुसार वाचा विकसित करा.
- मुलांची वाचा किंवा इतर क्रियांमध्ये व्यत्यय न आणता जेथे जरुर असेल तेथे व्याकरणासंदर्भातील चुकांची दुरुस्ती करा.
- आपल्या मुलांचे बोलणे ऐकण्यासाठी वेळ द्या.




# आपल्या मुलांना गोष्टी सांगणे

आपल्या कर्णबधीर मुलांना दिवसातून ४-५ गोष्टी सांगणे अधिक महत्वपूर्ण आहे, कारण, याद्वारे मुलांना श्रवण कौशल्य विकसित करण्यासाठी, संवाद कौशल्याची बांधणी आणि सुलभतेसाठी, तसेच शब्दसंग्रह आणि कल्पना बांधणीसाठी मदत मिळेल. कथा-कथन अनुभव तसेच मुलांचा भाषा स्तरावर आधारित असावी.

## सूचना...

- दिवसातून ४-५ गोष्टी सांगा / ऐकवा.
- गोष्टी सांगण्यासाठी वेळ निश्चित करा. ती वेळ झोपण्यापूर्वी किंवा मुलांची अंघोळ / स्नान झाल्यानंतरची असावी, जेव्हा मुले उत्साही आणि आरामदायक स्थितीत तसेच ऐकण्याच्या तयारीत असतात.
- मुले गोष्ट ऐकत आहेत याची खात्री करा.
- मूल आपल्याकडे पाहत आहे, लक्ष देत आहे, तसेच ऐकत आहे याची खात्री करा.
- आपल्या मुलांना प्रश्न विचारण्यासाठी प्रोत्साहन द्या.
- सामान्य शब्द, वाक्प्रचार आणि वाक्यांचा अर्थपूर्ण वापर करा.
- एकेक शब्द वापरण्याऐवजी वाक्यांमध्ये बोलण्याचा प्रयत्न करा.
- खुलासा / विवरण देण्याकरिता जेथे जरुरअसेल तेथे चित्रांचा आणि वस्तूंचा वापर करा.



# आपल्या मुलांसोबत मोठ्या आवाजात वाचन करा

जी व्यक्ती वाचन करीत आहे तिच्या वाचेमध्ये स्पष्ट आणि योग्य यमक असावा. जेव्हा व्यक्ती मोठ्या आवाजात वाचन करतात, तेव्हा कर्णबधीर मुले बऱ्याच गोष्टी शिकतात. मुले फक्त गोष्टी किंवा माहिती आत्मसात करीत नाहीत, तर ती व्यक्ती कोणत्या पद्धतीने पुस्तक वाचन करते किंवा त्या व्यक्तीची पुस्तक वाचन करण्याची पद्धत, जसे की, त्याच्या / तिच्या वचनातील लय, प्रश्नोच्चारादरम्यानचे वर्णोच्चार, उद्‌गारवाचक चिन्हांचा वापर करण्याची पद्धत बोली भाषेच्या प्रकटीकरणासारखीच असावी. असे समजले जाते की, पुस्तकी भाषा बोली भाषेपेक्षा वेगळी असते. पालक आणि शिक्षकांद्वारे शब्दावली, भाषास्तर, तसेच अनुभव इ. वर आधारित पुस्तके विकसित केली जाऊ शकतात. अशा रीतीने, कर्णबधीर मुलांना मोठ्या आवाजात वाचन करणे आनंददायी वाटेल.

## सूचना...

- आपल्या कर्णबधीर मुलांसाठी सोप्या आणि सुसंगत गोष्टींच्या पुस्तकांची रचना करा.
- आपल्या मुलांना योग्य वाचन पद्धतींच्या सवयासाठी प्रोत्साहन द्या.
- आपल्या मुलांना स्वतंत्रपणे गोष्टींच्या पुस्तकांची निवड आणि वाचन करु द्या.
- आपल्या घरात लहान पुस्तकालय बनवा.




# मुलांसाठी आणि मुलांसोबत गाणे

श्रवणबधीर मुलांची वाचा लयबद्ध नसते. गाण्यामुळे स्वरोच्चारांचा अभ्यास होतो, तसेच ते अर्थपूर्ण बनतात. मुलांकरिता गाणे आवश्यक / फायद्याचे असते, कारण त्यामुळे मुलांना बोली भाषेतील वाचेचे विविध प्रकार / पद्धती आणि वर्णोच्चार समजण्यास मदत होते. याद्वारे कर्णबधीर मुले एखाद्या विशिष्ट गाण्याचे पुनरुच्चारण करुन गाण्यास शिकतात. अशा रीतीने, मुले साध्या आणि सरळ लयबद्ध स्वरांची रचना तसेच अनुकरण करण्यास शिकतात. अशा प्रकारे, गाणे हे वाचेतील लयबद्ध वर्णोच्चारांची रचना विकसित करण्याचे एक साधन आहे.

## सूचना...

- संगीताच्या कॅसेट्स खरेदी करा.
- मुलांना संगीत ऐकण्यास भाग पाडा.
- आपल्या मुलांकरिता गाणे / कविता गा.
- आपल्या मुलांसाठी नियमितपणे गा.



# आपल्या मुलांसोबत नृत्य / नाच करणे

नाच केल्यामुळे लयबद्ध शरीराच्या विकासकार्यात मदत होते. लयबद्धता अचूक आणि नेमकी वाचा, तसेच वर्णोच्चार पद्धती विकसित करण्यास मुलांना मदत करते. जेव्हा आपले मूल नाच / नृत्य करते, तेव्हा तो / ती शब्दोच्चार सुरु झाल्यानंतर कर्णबधीर मुलांना क्रमाक्रमाने वाचा विकास शिकविला जावा.

## सूचना...

- घरामध्ये संगीत वाजवा आणि आपल्या मुलांना नाच करण्यास प्रवृत्त करा.
- आपल्या मुलांना संगीत ऐकण्यास, तसेच नाच करण्यास मदत करा.
- आपले मूल नाच करतेवेळी शब्दोच्चार करीत आहे, हे पहा.



# आपल्या कर्णबधीर मुलांना ध्वनींशी / आवाजांशी परीचय करुन देणे

श्रवणयंत्राच्या वापरामुळे कर्णबधीर मुले काहीतरी ऐकतात, परंतु, त्याला / तिला तो कोणता आणि कशा प्रकारचा आवाज / ध्वनी आहे हे समजण्यास अडचण निर्माण होते. म्हणूनच, कर्णबधीर असलेल्या आपल्या मुलांना आवाजांचा / ध्वनींचा परीचय करुन देणे आवश्यक आहे. याद्वारे त्याला / तिला आवाज पुन:पुन्हा ऐकण्यास आणि आवाजांच्या बोलण्यातून / उच्चारातून त्यांचे अनुकरण करण्यास मदत होईल. तो / ती पर्यावरणातील आवाज / ध्वनी, जसे की, वाहनांचे व पक्ष्यांचे आवाज आणि अपर्यावरणीय आवाज / ध्वनी, जसे की, वाक्ध्वनी यांमध्ये फरक करायला शिकतात. कर्णबधीर असलेली मुले अनावश्यक आवाजांकडे दुर्लक्ष करण्यास आणि आपण व इतर व्यक्ती जे बोलतात, त्याकडे लक्ष देण्यास शिकतात. पालक आणि शिक्षकांद्वारे श्रवण प्रशिक्षणाचा विकास केला गेला पाहिजे, जो आपल्या मुलांस श्रवण कौशल्य विकसित करण्यास उत्तेजन देईल.

## सूचना...

- ध्वनी / आवाज उत्पन्न करणारी खेळणी खरेदी / विकसित करा.
- परिचित ध्वनींकडे त्यांचे लक्ष वेधा.
- जेव्हा जेव्हा अपरिचित ध्वनी / आवाज उत्पन्न / निर्माण होईल त्या त्या वेळी आपल्या मुलांना सूचित / सतर्क करा.






# आपल्या कर्णबधीर मुलांना सामाजिक बनवा

कर्णबधीर मुले आपल्या पालकांशी आणि शिक्षकांशी बोलताना आरामदायीपणा अनुभवतात. पूर्वीचे अनुभव, अडचणी, इ. यांमुळे तो / ती इतर व्यक्तींशी बोलताना संकुचित होतात. या सर्व गोष्टी टाळल्या गेल्या पाहिजेत, कारण, त्यामुळे त्याला / तिला सामाजिक परिस्थितींमध्ये बोली भाषेचा वापर कसा करावा हे शिकण्यास अडचण निर्माण होते. सामाजिकरण आपल्या मुलांसाठी आवश्यक / महत्वाचे आहे, कारण, त्यामुळे आपल्या मुलांना इतर मुलांशी चर्चा / संवाद करण्याची संधी प्राप्त होते. एकदा आपले कर्णबधीर मूल सामाजिक झाले की, त्यानंतर त्याच्या / तिच्या बोली भाषेमध्ये सुधार होईल आणि त्यांच्यामध्ये असलेली भीती / भय व इतर अंतर्गत अडचणी हळूहळू कमी होतील.

## सूचना...

- कर्णबधीर मुलांस बोलला जात असलेला विषय किंवा मुद्दा समजत आहे, याची खात्री करा.
- चर्चा / वाद-विवाद यांमध्ये आपल्या मुलांचा सहभाग समाविष्ट करा.
- आपल्या कर्णबधीर मुलांना श्रवणयंत्र वापरण्यास प्रोत्साहन द्या.




# आपल्या मुलांना बोलण्याची संधी द्या

पालकांसोबत बोलणे हे कर्णबधीर मुलांसाठी पुरेसे नाही. आपल्या कर्णबधीर मुलांना इतर समवयीन सोबती / मुले, मित्र, शेजारी, नातेवाईक, इ. च्या संपर्कात आणणे योग्य ठरेल. जेव्हा कर्णबधीर असलेले मूल त्यांच्यासोबत मिसळून जाते, तेव्हा तो / ती इतर व्यक्ती एकमेकांशी कशा रीतीने संवाद साधतात, हे शिकतात. अशा रीतीने, मुले आपल्या संभाषणामध्ये परिवर्तन आणून बोलायला शिकतात.

## सूचना...

- आपल्या मुलांना खेळण्यासाठी किंवा वाढदिवस समारंभासाठी इतर मुलांच्या घरी पाठवा.
- आपल्या मुलांना आपल्या चर्चेमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन द्या.
- प्रत्येक दिवशी आपल्या अनुभवांद्वारे मुलांशी संबंध साधा.
- कर्णबधीर मुलांशी कशा रीतीने संवाद साधावा, याबद्दल शेजारी, मित्र आणि नातेवाईक यांना माहिती द्या.






# आपल्या कर्णबधीर मुलांना गोष्टी सांगण्यास प्रोत्साहन द्या.

प्रत्येक मुलांना अनेक गोष्टी सांगणे आवडते. विविध प्रकारच्या गोष्टी ऐकल्यानंतर कर्णबधीर मुले भावनांचे प्रगटीकरण कसे करावे, इतरांशी रीतसर पद्धतीने माहिती आणि घटनांची देवाण-घेवाण कशी करावी, हे शिकतात. स्पष्ट आणि सुलभ वाचा बोलण्यासाठी मुलांना हे फायद्याचे ठरते.

## सूचना...

- आपल्या मुलांना अनेक गोष्टींची पुस्तके उपलब्ध करुन द्या.
- गोष्टी सांगण्याकरिता मुलांसाठी योग्य वेळ निश्चित करा.
- जेव्हा आपले कर्णबधीर मूल गोष्टी सांगत असेल, तेव्हा त्याच्या / तिच्या चुकांची दुरुस्ती करा.
- आपल्या मुलांच्या गोष्टी ऐकण्यासाठी पुरेसा वेळ द्या.
- आपल्या कर्णबधीर मुलांसाठी सोप्या आणि सरळ गोष्टींची पुस्तके तयार करा / बनवा.






# आपल्या कर्णबधीर मुलांना संभाषण आणि बातम्यांमध्ये व्यस्त ठेवा

कर्णबधीर मुलांना वाचेची सुधारणा, भाषेची वाढती चालना आणि सामाजिकदृष्ट्या योग्य भाषा समजण्यास बातम्या आणि संभाषण फायद्याचे ठरते. कर्णबधीर मुलांना चर्चेमध्ये सहभाग घेण्याचे महत्व आणि मजेशीरपणा वाटावा, असे बनवा. याद्वारे आपल्या मुलांना जास्तीत जास्त बोलण्याची प्रेरणा मिळेल. आपले कर्णबधीर मूल किती चुका करते हे महत्वाचे नाही, त्याच्या / तिच्या वाचेतील चुकांची योग्य त्या वेळी दुरुस्ती केली जावी.

## सूचना..

- वर्तमानकालीन घटनांची चर्चा करा.
- प्रत्येक मुलांचा स्वभाव वेगवेगळा असतो, म्हणूनच त्याला / तिला जे काही मिळवायचे / करायचे आहे ते करु द्या आणि आपल्या इच्छा / अपेक्षांच्या पूर्ततेची अपेक्षा ठेवू नका.
- आपण काय शिकवत आहात तसेच मूल त्या शिक्षणाद्वारे काय शिकत / मिळवित आहे याची नोंद करण्यासाठी एक दैनंदिन पुस्तिका बनवा.
- आपल्या मुलांच्या गोष्टी ऐकण्यासाठी पुरेसा वेळ द्या.
- आपल्या कर्णबधीर मुलांसाठी सोप्या आणि सरळ गोष्टींची पुस्तके तयार करा / बनवा.




# आपल्या मुलांचे मार्गदर्शन करा

आपण आपल्या कर्णबधीर मुलांच्या दैनंदिन व्यवहारातील योग्य / उत्तम व्यक्ती आहात. कर्णबधीर मुलांच्या पालकांना भेटण्यास प्रयत्न करा, ज्याद्वारे आपणास विविध कल्पना मिळतील, जसे का, दळणवळणातील प्रगती, मुलांच्या दळणवळणातील क्षमता आणि अडचणी समजून घेणे, वाचा चिकित्सा, इ. अशा प्रकारे, मुलांना वाचेसंबंधी मार्गदर्शन करण्यास आपला आत्मविश्वास वाढवू शकता.

## सूचना...

- इतर पालकांना भेटा, त्यांच्याशी बोला आणि आपल्या अनुभवांची देवाण-घेवाण करा.
- ठराविक कालावधीमध्ये वेळोवेळी व्यवसायिकांकडून मार्गदर्शन घ्या.




## आपल्या मुलांच्या वाचेतील प्रगती विषयी सकारात्मक दृष्टिकोन ठेवा.

जर आपल्या कर्णबधीर मुलांची वाचेतील प्रगती हळू / सावकाश असेल, तर याचा अर्थ असा की,आपल्या मुलांना वाचा प्रशिक्षणानंतर बोलणे शिकण्यासाठी वेळेची आवश्यकता आहे. आपल्या कर्णबधीर मुलांच्या वाचेतील अडचणी आणि क्षमता जाणून घेणे महत्वाचे आहे. जर आपण आपल्या इच्छित प्रतिमेची छवी आपल्या मुलांसमोर ठेवाल, तर त्याची / तिची वाचापद्धती सकारात्मक होईल. जेव्हा कर्णबधीर मुलांना बोलणे शिकण्यास अडचण निर्माण होते, त्यावेळी आपण त्याला / तिला बोलण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

## सूचना...

- आपल्या मुलांबद्दल, किंबहुना स्वत:बद्दल सहानुभूती बाळगू नका, आपण त्याला / तिला बोलण्यास मदत करु शकता.
- त्याची / तिची तुलना त्याचे / तिचे भाऊ व बहिण आणि त्याच्या / तिच्या वयाची इतर मुले यांसोबत करु नका.
- त्याच्या / तिच्या क्षमतांना कमी लेखू नका.




# आपल्या मुलांच्या वाचेच्या आव्हानांना सामोरे जा

जेव्हा आपले कर्णबधीर मूल सामाजिक प्रसंगांमध्ये अशुद्ध वाचेचे उच्चारण करते, तेव्हा त्याचा आव्हानात्मकदृष्ट्या स्वीकार करा. जरी आपले कर्णबधीर मूल योग्य रीतीने ऐकण्यास किंवा बोलण्यास सक्षम नसेल, तरी तो / ती इतर सर्वसाधारण क्रिया इतर सामान्य व्यक्तींसारखेच करण्यास सक्षम असतात. कर्णबधीर मूलांना वाचेतील अडचणींवर मात करण्यासाठी सततच्या आधाराची गरज असते. हे महत्वाचे आहे, कारण, आपल्या मुलांना इतरांशी बोलताना शरम / लाज वाटू शकते, जे टाळले गेले पाहिजे. आपल्या मुलांसोबत शिकण्यास सुरुवात करा आणि तुम्हाला लवकरच कळून येईल की, आपले कर्णबधीर मूल सामान्यपणे ऐकणाऱ्या व्यक्तींसारखेच आहे.

## सूचना...

- आपल्या कर्णबधीर मूलांना मदतीसाठी व्यावसायिकांकडे घेऊन जा.
- आपल्या मुलांच्या वाचा प्रशिक्षणाकडे लक्ष द्या आणि त्यामध्ये सहभागी व्हा.



## आपल्या मुलांना स्वयं - शोधनासाठी तयार करणे

सर्व मुलांना आपल्या आवडीच्या पर्यावरणाचा / परिस्थितीचा शोध घेण्यास आवडते. या स्तरावर त्यांना बोलणे शिकविण्याची संधी प्राप्त होते. आपण मुलांच्या कार्याचे वर्णन करुन त्यासंदर्भात त्यांना प्रश्न विचारण्यास सुरुवात करु शकता, जसे की, खेळण्यांसोबत खेळणे, चित्रकला, फुले एकत्र करणे, नाच करणे, इ. आणि आपणांस आवडीने प्रतिसाद देत आहे. कर्णबधीर मुलांना जास्तीत-जास्त बोलण्यास प्रोत्साहन द्या, जेव्हा तो / ती त्याच्या / तिच्या आवडत्या क्रियांमध्ये आपणांसोबत दंग असेल.

## सूचना...

- आपल्या मुलांना स्वतः गोष्टी करण्यास आणि हाताळण्यास द्या.
- आपपल्या मुलोंना पर्यावरणाचा (आवडत्या) शोध घेण्यास, तसेच अधिकाधिक शिकण्यास द्या.
- आपल्या मुलांना अधिक आधार देऊ नका / त्यांचा बचाव करु नका किंवा त्यांना नाकारु नका.
- आपल्या स्वाभावाशी परस्पर विसंगत राहू नका.
- आपल्या मुलांना एकाच वेळी अधिक शिकवू नका.
- बोलताना अतिशयोक्ती करु नका.
- आपल्या मुलांतील गुणदोष तो / ती बोलत असताना दाखवू नका.
- प्रत्येक वेळी आपल्या मुलांच्या चुकांची दुरुस्ती करु नका.
- नैसर्गिकरित्या आणि सर्वसाधारण पद्धतीने बोला.



इतर सर्व बाबींपेक्षा आपल्या प्रेमाची, जिव्हाळ्याची
आणि जागरुकतेची आवश्यकता असते, हे लक्षात ठेवा.





# अली यावर जंग राष्ट्रीय वाक् एवं श्रवण दिव्यांगजन संस्थान

# ALI YAVAR JUNG NATIONAL INSTITUTE OF SPEECH AND HEARING DISABILITIES (DIVYANGJAN)

**(दिव्यांगजन सशक्तिकरण विभाग, सामाजिक न्याय और अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार का स्वायत्त निकाय)**

**(An autonomous body under the Department of empowerment of Persons with Disabilities (Divyangjan),**
**Ministry of Social Justice and Empowerment, Government of India)**

**K.C. Marg, Bandra (W) Reclamation Mum:400050**
**Phone : 022- 26400228 / 69102100**
**E-mail : ayjnihh-mum@nic.in**
**Web: https://ayjnishd.nic.in/**